आयुक्त, कुटुंब कल्याण व
संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२६२००३३/३५
०२२ – २२६२६५००
फॅक्स – ०२२ २२६२२०७७
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, छत्रपती शिवाजी टर्मिनस जवळ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.

राग्राआअ/EMS/रेफ.ट्रान्सपोर्ट/२०१२/३८४३-३३२
दि. २८.०२.२०१२.

प्रति,

जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय,
स्त्रीरुग्णालय.

(औरंगाबाद, धुळे, गडचिरोली, कोल्हापूर, लातूर, नांदेड, नाशिक, उस्मानाबाद, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर, वाशिम, यवतमाळ.)

विषय :- JSSK कार्यक्रमांतर्गत परतीच्या प्रवासासाठी (DROP BACK) वाहने.

संदर्भ :- १) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत Referral Transport कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचना.

२) आरोग्य भवन, मुंबई येथे जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांची दि. २१ ते २५ नोव्हेंबर, २०११ या कालावधीतील बैठकीतील निर्णय.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत रेफरल ट्रान्सपोर्ट हा कार्यक्रम जिल्हा स्तरावर जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत राबविला जातो या कार्यक्रमांतर्गत :-पुढीलप्रमाणे विनामुल्य संदर्भ वाहतुक सेवा पुरविण्यात येते.

१) प्रसुतीपुर्व वेदनेच्या काळात व प्रसुतीसाठी निवासस्थानापासुन रुग्णालयात जाण्यासाठी व प्रसुती झाल्यानंतर मातेला नवजात बालकासह निवासस्थानी परत पोहोचविण्यासाठी.

२) ० ते ३० दिवस या वयोगटातील आजारी बालकास व त्याच्या मातेस निवासस्थातुन रुग्णालयात व रुग्णालयातून निवासस्थानी परत पोहोचविण्यासाठी.

३) रेफरल ट्रान्सपोर्ट या योजनेअंतर्गत मोफत वाहन सेवा पुरविण्याची योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या योजनेतंर्गत प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात २४ तास कार्यरत असणारा संपर्क कक्ष तयार करण्यात आला असून या संपर्क कक्षात १०२ हा टोल फ्री क्र. बसविण्यात आलेला आहे. या ठिकाणी पाळी पध्दतीवर ५ प्रशिक्षित कर्मचारी नेमण्यात आली आहेत. नागरिकांनी १०२ या टोल फ्री क्रमांकावर दुरध्वनी करुन निवासी पत्ता व रुग्णाबद्दलची माहिती दिल्यानंतर रुग्णांच्या

निवासस्थानी मोफत रुग्णवाहिका पाठविण्यात येते व प्रसुतीसाठी जाणाऱ्या मातेसाठी किंवा बालकासाठी विना मोबदला रुग्णवाहीका सेवा दिली जाते. त्याचप्रमाणे रुग्ण परत जाते वेळी उपरोक्त उल्लेख केल्याप्रमाणे परतीची वाहतूक व्यवस्था देखील केली जाते. सदर योजना कार्यान्वीत करण्यासाठी उपलब्ध शासकिय रुग्णवाहीका वापरल्या जातात व शासकिय रुग्णवाहिका त्वरीत उपलब्ध न झाल्यास तालुका स्तरावर Empanel केलेल्या खाजगी रुग्णवाहिका Call basis वर भाडेतत्वावर घेऊन पुरवठा करणे अपेक्षित आहे. खाजगी रुग्णवाहिका त्वरेने उपलब्ध होण्यासाठी जिल्हा पातळीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व अन्य अधिकाऱ्यांची एक समिती गठित करण्यात आली असुन या समितीच्या माध्यमातुन भाडेतत्वावरील रुग्णवाहीकांचे panel तयार करणे व त्यांचे दर ठरविणे, याबाबतची कार्यवाही केली जात आहे. यासाठी आवश्यक त्या मार्गदर्शक सुचना राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कृती आराखड्याच्या माध्यमातुन देण्यात आल्या आहेत. तथापि अशा खाजगी रुग्णवाहिकांचे panel तयार करण्यामध्ये क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अडचणी येत आहेत. याबद्दल उपरोक्त संदर्भ क्र २ नुसार झालेल्या बैठकीमध्ये रुग्णास परत घरी सोडण्यासाठी (DROP BACK) रुग्णवाहीका देण्याची साधारणपणे आवश्यकता नसते, सबब परतीच्या प्रवासासाठी नेहमीचे साधेवाहन उपलब्ध करुन दिल्यास चालु शकते, असे मत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

४) वर उल्लेख केलेल्या अडचणींचा विचार करुन जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यामार्फत ज्या ठिकाणी रुग्णांना परत घरी सोडण्यासाठी (DROP BACK) दररोजची संख्या जास्त आहे अशा रुग्णालयांसाठी साधे परवानेधारक प्रवासी वाहन मासिक भाडेतत्वावर घेण्याची परवानगी देण्यात येत आहे. राज्यातील नियतव्य १७ ठिकाणी असणाऱ्या जिल्हा रुग्णालय व स्त्री रुग्णालय या ठिकाणी प्रसुतीची संख्या मोठया प्रमाणात असल्याने रुग्णांना घरी पोहोचविण्यासाठी एक साधे वाहन रुग्णांच्या परतीच्या प्रवासाकरीता (DROP BACK) भाडयाने घेण्यासाठी एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

५) JSSK योजनेअंतर्गत रुग्णाला DROP BACK साठी त्वरीत वाहने आवश्यक असल्याने शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमातंर्गत जिल्हयात ज्या दराने वाहने भाडयाने घेण्यात आलेली आहेत त्याचदराने प्रस्तुत कार्यक्रमासाठी एक वाहन ३१ मार्च २०१२ पर्यंत भाडयाने घ्यावे. तथापि १.०४.२०१२ नंतरच्या कालावधीसाठी जिल्हा शल्य चिकित्सकांनी JSSK च्या DROP BACK साठीचे वाहन मासिक भाडे तत्वावर घेण्याचे दर विहित प्रक्रिया पार पाडुन दि.३१ मार्च, २०१२ पर्यंत निश्चित करावेत व त्या नवीन दराने त्यापुढे सामान्य रुग्णालय/स्त्रीरुग्णालय येथे एक वाहन भाडयाने घेण्यात यावे.

६) तथापी भाडयाने घ्यावयाचे वाहन हे सुस्थितीत असावे व ते ५ वर्षा पेक्षा जुने नसावे त्याचप्रमाणे या वाहन धारकाकडे प्रवासी वाहतुकीचा परवाना असावा व वाहन चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना (Driving License) असावा.

७) वाहनामध्ये रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांची बसण्याची सोय आरामदायी असावी व ते यांत्रिकदृष्टया सक्षम असल्याची खात्री करावी.

८) वाहन मालकाकडे प्रवासी वाहतुकीचा परवाना असावा वाहनास वैध फिटनेस प्रमाणपत्र कर भरल्याचा पुरावा व विमा प्रमाणपत्र असावे.

९) मासिक भाडे तत्वावर घेतलेल्या वाहनांची देयके धनादेशाद्वारे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी "JSSK अंतर्गत Referral Transport साठी प्राप्त होणा-या निधीतून करावेत.

१०) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक यांनी ३१ मार्च २०१२ पर्यंत जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमातंर्गत DROP BACK साठीची वाहने शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमानुसार घेण्यात आलेल्या वाहनांच्या दरानुसार सदर वाहन भाडयाने घेतल्याचा तपशीलाचा अनुपालन अहवाल ३१ जानेवारी २०१२ पर्यंत आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान येथे सादर करावा तसेच १ एप्रिल २०१२ नंतरच्या कालावधीसाठी घेण्यात येणा-या वाहनांचा तपशील ३१ मार्च २०१२ पर्यंत कार्यालयास सादर करावा.

११) सदर कार्यक्रमाच्या परतीच्या प्रवासासाठी जिल्ह्यांच्या सामान्य रुग्णालय/स्त्री रुग्णालय येथे नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामधील प्रसुतीचा आढावा घेऊन जर तेथे प्रसुती कमी होत असतील व त्याचा भार जिल्हा रुग्णालयावर येत असेल तर PHC येथील वाहन परतीच्या प्रवासासाठी उपलब्ध करुन दयावे.

सही/-

आयुक्त, कुटुंब कल्याण व संचालक,
राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान,
महाराष्ट्र, मुंबईकरिता.

प्रत सविनय सादर :
१) मा. अप्परमुख्य सचिव, आरोग्य विभाग, मंत्रालय.

प्रत माहीतीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-

१) सर्व नियंत्रक अधिकारी, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य, मुंबई.
२) अतिरिक्त संचालक, कु.क, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य सेवा, पुणे.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, (१७ जिल्हे)
४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हापरिषद, (१७ जिल्हे)
५) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, त्यांना सुचना देण्यात येतात कि, या परिपत्रकाप्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल दि. ३१/०१/२०१२ पूर्वी या कार्यालयास सादर करावा. (१७ जिल्हे)